# नवी मुंबई महानगरपालिका

## जाहीर आवाहन

मा. उच्च न्यायालयाने दिनांक 04.03.2015 रोजी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार नवी मुंबई महानगरपालिकेमधील सर्व विभाग कार्यालयामध्ये अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यासाठी **"तक्रार निवारण कक्ष"** स्थापन करण्यात आलेला आहे. या तक्रार निवारण कक्षाद्वारे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात येत आहे. अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 53(8) मधील तरतुदीच्या अनुषंगाने विभाग अधिकारी यांना दिनांक 07 जुलै 2015 रोजीच्या राजपत्रात **"पदनिर्देशित अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोठेही अनधिकृत बांधकाम होत असल्यास आपण त्याबाबतची माहिती संबंधित विभाग अधिकारी यांना खालील टोल फ्री क्रमांकावर देण्यात यावी. सदरचे टोल फ्री क्रमांक नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळावर (www.nmmc.gov.in) प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. तसेच नागरीकांना अनधिकृत बांधकाम संबंधिच्या तक्रारी छायाचित्रासह सदरच्या संकेतस्थळावर grievance handling system वर आणि Whats app क्रमांक 8422955912 वर देखिल नोंदविता येतील.

| **विभाग कार्यालयाचे नांव** | **पदनिर्देशित तथा विभाग अधिका-यांचे नांव** | **टोल फ्री क्रमांक** |
|---|---|---|
| बेलापूर | श्रीम. प्रियांका काळसेकर | 1800 222 312 |
| नेरुळ | डॉ. ज्योती धोत्रे | 1800 222 313 |
| तुर्भे | श्रीम. अंगाई साळुंखे | 1800 222 314 |
| वाशी | श्री. महेंद्रसिंग ठोके | 1800 222 315 |
| कोपरखैरणे | श्री. अशोक मढवी | 1800 222 316 |
| घणसोली | श्री. दत्तात्रय नागरे | 1800 222 317 |
| ऐरोली | श्री. तुषार बाबर | 1800 222 318 |
| दिघा | श्री. प्रकाश वाघमारे | 1800 222 319 |
| मुख्यालय | | 1800 222 309<br>1800 222 310 |

नागरीकांनी अनधिकृत बांधकामाची तक्रार दिल्यानंतर तक्रार निवारण कक्षामार्फत संबंधित अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यात येते व नागरीकांना त्याबाबत अवगत करण्यात येते.

नवी मुंबई महानगरपालिकेची बांधकाम परवानगी न घेता किंवा भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेता बांधलेल्या इमारतीमधील सदनिकेची/गाळयाची खरेदी नागरीकांनी करु नये.

अनधिकृत इमारतीमधील सदनिका/गाळे खरेदी केल्यास व भविष्यात त्या अनुषंगाने अनधिकृत बांधकामावर सिडको/एमआयडीसी/नवी मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून निष्कासनाची कारवाई झाल्यास अनधिकृत इमारतीमध्ये सदनिका/गाळे खरेदी करणा-या नागरीकांना आर्थिक नुकसान व मानसिक त्रास होवू शकेल.

सबब नागरीकांनी सदनिका/गाळे खरेदी करण्यापुर्वी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र असल्याची खातरजमा करुनच सदनिका/गाळे खरेदीचे व्यवहार करवोत, अन्यथा होणा-या परिणामास महापालिका जबाबदार राहणार नाही, असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

सही/-

**आयुक्त**

**नवी मुंबई महानगरपालिका**